## नियमित दिवाणी दावा क्र. १६१/२०१९ मधील नि.क्र. ३५ खाली आदेश
## (रमेश किशोर गायकवाड वि. मौला बादशाह कुरणे)
## (CNR No.MHSN020007262019)

अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, दावा हा करारपत्रावरुन खरेदीपत्र होऊन मिळणेकरिता व निरंतर मनाईकरिता दाखल करण्यात आलेला असून तो वादी यांच्या उलटतपासाकरिता प्रलंबीत आहे. प्रस्तुत प्रकरणात वादी यांनी दिनांक १२/०२/२०२० रोजी निशाणी क्र. १३ कडे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. परंतु प्रस्तुत प्रतिवादी यांना वारंवार पुरेशी संधी देऊन देखील वादीचा उलटतपास घेतलेला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द दिनांक २०/०६/२०२४ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. परंतू, प्रस्तुत अर्जातील कथन तसेच दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता तसेच प्रकरणात वादी व प्रतिवादी यांचे हितसंबंध गुंतले असल्यामुळे प्रतिवादींना वादीचा उलटतपास घेण्याची संधी देवुन प्रकरण गुणदोषावर चालविणे न्यायोचित होईल, जेणेकरुन वादी व प्रतिवादींमधील सर्व वादप्रश्न कायदेशीर गुंतागुंत न वाढविता प्रकरण निकाली काढण्यास न्यायालयास मदत होईल. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

:: **आदेश** ::

१. अर्ज (निशाणी ३५) मंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च म्हणून प्रस्तुत प्रतिवादी यांनी वादींना रक्कम रु.५००/– द्यावेत.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2026.02.23 15:10:50 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. २१/०२/२०२६ सह.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.